**<u>रे.मु.नं.११४/२०१२</u>**
यशवंत वि. भास्कर
नि.क्र. १८८ लगत
प्रतिवादीतर्फे सा.क्र.०१

१०. शपथेवर सांगतो की, मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

**प्रतिवादी क्र.३, ७, १२, २३ व २४ यांचेतर्फे विधिज्ञ श्री.ए.ए.गोगटे यांनी उलटतपास नाकारला.**

**वादीतर्फे विधिज्ञ श्री.बी.एम.दळवी यांचेमार्फत–**

११. माझा जन्म सन १९७७ मध्ये झाला. माझे शिक्षण मिठबाव येथे झाले. मी कैफियतीमध्ये नमुद असलेल्या वंशावळीमधील बाबू, देवू, येसू, तुकाराम व भिकाजी यांना पाहिलेले नाही. त्यामुळे त्यांचा जन्म मृत्यू कधी झाला हे मला सांगता येणार नाही. तुकाराम यांचा मृत्यू अंदाजे सन १९६८ मध्ये झाल्याची माझी ऐकिव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवू यांना भिकाजी नावाचा मुलगा होता, बाबु यांना येसु नावाचा मुलगा होता हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, गहाणखतामध्ये येसू यांचे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१७८ वरील गहाणखतामध्ये बाबु यांना येसु नावाचा मुलगा होता असा उल्लेख केलेला नाही.

**<u>रे.मु.नं.११४/२०१२</u>**

यशवंत वि. भास्कर

नि.क्र. १८८ लगत

प्रतिवादीतर्फे सा.क्र.०१

१२. मी कैफियतीमध्ये नमुद असलेल्या वंशावळीमधील रामचंद्र यांना पाहिलेले नाही. त्यामुळे त्यांचा जन्म मृत्यू कधी झाला हे मला सांगता येणार नाही. लक्ष्मण येसू यांना मी पाहिले होते. त्यांचा जन्म कधी झाला हे मला सांगता येणार नाही. परंतू, त्यांचा मृत्यू सन २००० मध्ये झाला परंतू त्याची निश्चित तारीख मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, लेखी कैफियतीमध्ये संपूर्ण खोटी वंशावळ नमुद केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, देवू यांना भिकाजी व भिकाजी यांना वंशावळीत नमुद अपत्ये होती हे खोटे सांगत आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२३ व २४ यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना त्यांना फुकट दावा मिळकतीमध्ये हिस्सा देण्यासाठी त्यांना दाव्यात समाविष्ट करण्यासाठी अर्ज दाखल करण्यास सांगून नंतर मी माझ्या बाजुने लेखी कैफियत देण्यास भाग पाडले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२३ व २४ यांचे दावा मिळकतीच्या महसूल नोंदी नावे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२३ व २४ यांनी त्यांच्या नावाची नोंद महसुल दप्तरी होण्यासाठी केलेले सर्व अर्जातील निकाल त्यांच्या विरोधात गेले आहेत.

१४.      माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत नि.क्र.१७८ वरील गहाणखतान्वये देवू, तुकाराम व रामचंद्र यांनी विश्राम रावराणे यांच्याकडे गहाण ठेवली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर गहाणखतामुळे देवू, तुकाराम व रामचंद्र यांची मालकी व ताबा विश्राम रावराणे यांच्याकडे गेला. मला माहिती नाही की, गहाणखत झाल्यानंतर वरील इसमांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध राहिला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर गहाणखत वादीच्या वडिलांनी सोडून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर गहाणखत महादेव धाकू घाडी यांनी सोडवून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, माधव घाडी यांना कोणीही वारस नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१७८ वरील गहाणखतामध्ये तुकाराम घाडी यांनी गहाणखत सोडवण्यासाठी ५००/–रुपये दिल्याचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम घाडी यांनी विश्राम रावराणे यांना वरील रक्कम देऊन गहाणखत सोडवून घेतले. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम घाडी हे वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांचे वडिल आहेत. हे मला माहिती नाही की, महादेव घाडी व तुकाराम घाडी यांनी स्वतः रक्कम देऊन गहाणखत सोडवले होते म्हणून दावा मिळकती त्यांच्या मालकीच्या झाल्या होत्या किंवा नाही. हे मला माहिती नाही की, महादेव घाडी हे विनावंशज मरण पावल्याने संपूर्ण दावा मिळकती या तुकाराम घाडी यांच्या मालकीच्या झाल्या होत्या व त्यांच्या मृत्यूनंतर सदर मिळकती त्यांच्या मुलांच्या मालकीच्या झाल्या होत्या किंवा नाही. हे मला माहिती नाही की, दावा मिळकत तुकाराम यांनी सोडवली होती त्यामुळे दावा मिळकतीचे महसुल दप्तरी त्यांच्या नावाची नोंद झाली

**<u>रे.मु.नं.११४/२०१२</u>**

यशवंत वि. भास्कर

नि.क्र. १८८ लगत

प्रतिवादीतर्फे सा.क्र.०१

होती किंवा नाही व त्यानंतर त्यांच्या मुलांचे नावाची नोंद झाली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ वगळता इतर कोणाचाही दावा मिळकतीशी हितसंबंध नाही.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दावा घर मिळकतीचे बांधकाम तुकाराम यांनी केले होते व त्यानंतर वादीने त्याचे स्वखर्चातून पुर्नबांधणी केली. हे म्हणणे खरे नाही की, दावा घर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ राहतात. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत असलेल्या सर्व फळझाडांची लागवडे वादी व प्रतिवादी क्र..०१ ते ०३ यांनीच केली असून त्याचे उत्पन्न देखील तेच घेतात. हे म्हणणे खरे नाही की, वादीला दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळू नये म्हणून प्रतिवादी क्र.२३ व २४ यांना हाताशी धरून संपूर्ण खोट्या मजकुराची लेखी कैफियत दाखल करुन संपूर्ण खोट्या मजकुराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.15 16:23:23 +1000

दि. १५/०२/२०२३. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड